नियमीत फौजदारी प्रकरण क्र.६६६/२०२०

शासन–विरुध्द–अब्दुल

निशाणी क्र. १५

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी –**

**मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव –राजू वामन कुत्तरमारे

वय –४७ वर्षे, कामधंदा –दुध व्यवसाय,

राहणार–खापरी, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे स.शा.अ. श्री. एस.आर.ठावरी यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

०१. घटना ही २४/०२/२०२० रोजी भद्रावती–चंद्रपूर मुख्य महामार्गावर एन.टी.पी.सी.च्या समोर घडली होती. त्यावेळी मी काही कामासाठी भद्रावतीला गेलो होतो. आमच्याकडे एकूण ५ म्हशी होत्या. त्यादिवशी माझे वडील म्हशी राखण्याकरीता गावाचे शेजारी गेले होते. म्हशी बुजाळल्यामुळे त्या पळुन गेल्या आणि वडीलांना त्या मिळाल्या नाहीत. त्यापैकी तीन म्हशी रात्री १० ते ११ चे दरम्यान घरी परत आल्या आणि उर्वरीत दोन म्हशींचा एन.टी.पी.सी.समोर अपघात झाल्याचे मला माझा चुलत भाउ वैभव कुत्तरमारे याने सांगितले. वैभवचा मित्र सुमीतने त्या म्हशींना डि.एन.आर. ट्रॅव्हलसने धडक दिल्याचे त्याने डोळयाने बघीतले व त्यामुळे त्याने वैभवला सांगितले. करीता मी नमुद ठिकणी जावून बघीतले असता, एक म्हैस मरुन पडली होती आणि एक मरणाच्या स्थीतीत होती. याव्यतिरिक्त तेथे काहीच नव्हते. मी माझ्या म्हशींना ओळखले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली. मला दाखविण्यात आलेल्या रिपोर्ट आणि एफ.आय.आर. वर वर सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र.१६ व १७** देण्यात येते. दुसरी म्हैस देखील दुस–या दिवशी मरण पावली. घटना ही रात्री १२ वाजताचे दरम्यान घडली. पोलीसांनी माझे बयाण घेतले होते. मृत म्हशींचे शवविच्छेदन जनावरांचे डॉक्टर यांनी केले. डि.एन.आर.गाडीचे चालक नामे रहीम अब्दुल यांचेवर गुन्हा नोंद केला. म्हशी मरण पावल्यामुळे माझे ८० हजाराचे नुकसान झाले.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी तर्फे उलट तपास विधीज्ञ श्री.धोटे यांच्या मार्फत–**

हे खरे आहे की, भद्रावती–चंद्रपूर हा रस्ता कायम चालू असतो. ज्या गाडीने धडक दिली त्या गाडीचा क्रमांक माझे भावाला त्याचे मित्राने सांगितला नव्हता. माझे भावाला त्याचे मित्राने ती गाडी कोण चालवीत होता, त्याचे नाव सांगितले नव्हते. हे खरे नाही की, वैभवचा मित्र सुमीतने त्या म्हशींना डि.एन.आर. ट्रॅव्हलसने धडक दिल्याचे त्याने डोळयाने बघीतले व त्यामुळे त्याने वैभवला सांगितले, हे खोटे आहे. हे खरे नाही की, माझ्या कुठल्याही म्हशी मरण पावल्या

नाहीत व डि.एन.आर.ट्रॅव्हल्सने धडक दिल्यशमुळे म्हशी मरण पावल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे खरे नाही की, डि.एन.आर.गाडीचे चालकावर गुन्हा नोंद झाल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे खरे नाही की, मला खरे काय ते माहित नसून मी खोटी रिपोर्ट दिली आहे व मी आज खोटी साक्ष दिली आहे.

**<u>उलट तपास–पुर्ण.</u>**

**<u>फेर तपास–नाही.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत, समक्ष,

Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT Date: 2026.03.27 12:45:37 +0530

दिनांकः– २५/०३/२०२६ **(ए.एस. जरुदे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भद्रावती